# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ४ ] सोमवार, एप्रिल १९, २०१०/चैत्र २९, शके १९३२ [ पृष्ठे ९, किंमत रुपये २६.००

**असाधारण क्रमांक १०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.—** महाराष्ट्र राज्यात, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची स्थापना करण्यासाठी आणि त्याचे विनियमन करण्यासाठी तसेच तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम. | पृष्ठे १-९ |

दिनांक १८ एप्रिल २०१० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक १९ एप्रिल २०१० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र राज्यात, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची स्थापना करण्यासाठी आणि त्याचे विनियमन करण्यासाठी तसेच तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

**ज्याअर्थी,** दहशतवादी संघटना, समाज विघातक घटक व अंडरवर्ल्डचे गुन्हेगार यांपैकी कोणाहीकडून देण्यात आलेल्या धमक्यांना तोंड देण्यासाठी, राज्य शासन व केंद्र शासनाची कार्यालये, त्यांचे उपक्रम, अशा सर्व आस्थापनांचे कर्मचारी, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, प्रमुख प्रतिष्ठापने, वित्तीय संस्था, धार्मिक संस्था, शैक्षणिक संस्था, सांस्कृतिक संस्था व वैद्यकीय संस्था आणि तत्सम ; आणि शासनाशी संयुक्त

करार करून किंवा शासन किंवा शासनाच्या मालकीचे महामंडळ यांच्यात याबाबतीत सामंजस्य करार करून किंवा शासनाचा अन्य कोणताही विभाग, शासकीय महामंडळ, शासकीय किंवा निमशासकीय संस्था यांद्वारे, याबाबतीत स्वतंत्र तरतुदी करून निर्माण केलेले मोठे पूल, विशेष आर्थिक क्षेत्रे, खाजगी बंदरे व लहान धक्के, धरणे व द्रुतगती मार्ग, इत्यादी पायाभूत सुविधांना आणि मॉल्स, मल्टिप्लेक्स, क्लब, हॉटेल इत्यादी यांसह वाणिज्यिक आस्थापनांना, सक्षम प्राधिकारी यांनी केलेल्या विशेष विनंतीवरून, सुसज्ज मनुष्यबळामार्फत व्यावसायिक सेवा पुरवून त्यांचे अधिक चांगले संरक्षण करण्यासाठी व त्यांना सुरक्षा पुरविण्यासाठी आणि अशा सर्व आस्थापनांना व संस्थांना तंत्रविषयक सल्ला देण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबी यांकरिता, एका दलाची उभारणी करण्याच्या प्रयोजनासाठी, महाराष्ट्र राज्यात सुरक्षा महामंडळ स्थापन करणे, इष्ट होते ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची स्थापना करण्यासाठी आणि त्याचे विनियमन करण्यासाठी तरतूद करणे आवश्यक झाले होते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांसाठी, कायदा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तत्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक ११ मार्च २०१० रोजी, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अध्यादेश, २०१०, प्रख्यापित केला होता ; २०१० चा महा. अध्या. ४.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अधिनियम, २०१० असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, दिनांक ११ मार्च २०१० पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(क) " मंडळ " याचा अर्थ, कलम ९ अन्वये घटित केलेले संचालक मंडळ, असा आहे ;

(ख) " आकार " याचा अर्थ, महामंडळाद्वारे विनिर्दिष्ट केलेला आकार, असा आहे ;

(ग) " वाणिज्यिक आस्थापना " याचा अर्थ, जी, कोणताही उद्योग, धंदा, व्यापार, व्यवसाय चालवित असेल किंवा सेवा पुरवित असेल किंवा वरील बाबींशी संबंधित किंवा त्याच्याशी अनुषंगिक किंवा सहाय्यभूत ठरेल असे कोणतेही काम करीत असेल, अशी आस्थापना, असा आहे ;

(घ) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ, राज्य व केंद्र शासनाची कार्यालये, उपक्रम, उद्योग, औद्योगिक उपक्रम, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, प्रमुख प्रतिष्ठापने, वित्तीय संस्था, धार्मिक संस्था, सांस्कृतिक संस्था, वैद्यकीय संस्था, वाणिज्यिक आस्थापना आणि तत्सम यांचे कामकाज पाहणारी व्यक्ती आणि त्याचप्रमाणे व्यवस्थापकीय संचालक, व्यवस्थापन अभिकर्ता, महाव्यवस्थापक, व्यवस्थापक, मुख्य कार्यकारी अधिकारी इत्यादी आणि असे उपक्रम किंवा आस्थापना किंवा संस्था यांच्या कामकाजांवर नियंत्रण ठेवणारी व्यक्ती, असा आहे ;

(ङ) " महामंडळ " याचा अर्थ, कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये घटित केलेले महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, असा आहे ;

(च) " महासंचालक व महानिरीक्षक ", " अपर महासंचालक व महानिरीक्षक ", " विशेष महानिरीक्षक "," उप महानिरीक्षक " व " अधीक्षक " यांचा अर्थ, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे, अनुक्रमे " पोलीस महासंचालक व महानिरीक्षक ", " अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक ", " विशेष पोलीस महानिरीक्षक ", " पोलीस उप महानिरीक्षक " व " पोलीस अधीक्षक ", असा आहे ;

१९५१ चा मुंबई २२.

(छ) " शैक्षणिक संस्था " याचा अर्थ, विशिष्ट कामाचे किंवा विशेषकरून एखाद्या सार्वजनिक, शैक्षणिक किंवा धर्मादाय स्वरुपाच्या कार्यक्रमाचे प्रचालन करण्यासाठी वाहून घेतलेली संघटना, आस्थापना, प्रतिष्ठान, संस्था किंवा तत्सम, असा आहे ;

(ज) " सुरक्षा दलाचा नाव नोंदणी केलेला सदस्य " याचा अर्थ, पर्यवेक्षी अधिकारी व दुय्यम अधिकारी वगळता महामंडळाचा कोणताही सदस्य, असा आहे ;

(झ) " वित्तीय संस्था " याचा अर्थ, लोकांकडून निधी गोळा करणाऱ्या व तो निधी संस्थांच्या वित्तीय मत्तांमध्ये ठेवणाऱ्या, बँक, स्टॉक एक्सचेंज, भारतीय रिझर्व्ह बँक, आयसीआयसीआय, भारतीय औद्योगिक विकास बँक, इत्यादींसारख्या वित्तीय सेवा देऊ करणाऱ्या किंवा दलाली घेणाऱ्या संस्था किंवा संघटना आणि ठेवी स्वीकारणे, म्युचुअल फंड, लेखे तपासणे, कर्जे देणे किंवा विम्यासह विविध गुंतवणूक सेवा पुरविणे यांसारख्या वित्तीय सेवा देऊ करणारी विमा कंपनी, असा आहे ;

(ञ) " शासन " किंवा " राज्य शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ट) " उद्योग " याचा अर्थ, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ अन्वये व्याख्या केलेला उद्योग, असा आहे, आणि त्यात कोणत्याही उद्योगात, किंवा कोणत्याही व्यापार, धंदा किंवा सेवा यात गुंतलेल्या कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये व्याख्या केलेल्या कंपनीचा, किंवा भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ अन्वये नोंदणी केलेल्या भागीदारी संस्थेचा देखील समावेश असेल ;

१९४७ चा १४.
१९५६ चा १.
१९३२ चा ९.

(ठ) " पायाभूत सुविधा " याचा अर्थ, संस्थेच्या किंवा उद्यमाच्या प्रवर्तनासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत भौतिक व संघटनात्मक संरचना किंवा रस्ते, पूल, द्रुतगतीमार्ग, पाणीपुरवठा, मलप्रणाल, पॉवर ग्रीड, टेलिकम्युनिकेशन आणि तत्सम यांसारखी कामे करण्याकरिता अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक असणाऱ्या सेवा व सुविधा, असा आहे ;

(ड) " वैद्यकीय संस्था " याचा अर्थ, औषध वैद्यकशास्त्राच्या व्यवसायाकरिता निर्माण केलेली संस्था, असा आहे आणि यात रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये व संबंधित सुविधा व सेवा यांचा समावेश होतो ;

(ढ) " सुरक्षा दलाचा सदस्य " याचा अर्थ, कलम ६ अन्वये सुरक्षा दलाचा सदस्य म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे ;

(ण) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमाद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(त) " धार्मिक संस्था " याचा अर्थ, सार्वजनिक उपासनास्थळ, असा आहे ;

(थ) " सुरक्षा दल " याचा अर्थ, कलम ४ अन्वये घटित केलेले सुरक्षा दल, असा आहे ;

(द) " राज्य राखीव पोलीस दल " याचा अर्थ, मुंबई राज्य राखीव पोलीस दल अधिनियम, १९५१ अन्वये घटित केलेले राज्य राखीव पोलीस दल असा आहे ;

१९५१ चा मुंबई ३८.

(ध) " दुय्यम अधिकारी " याचा अर्थ, कलम ३ अन्वये नियुक्त केलेला महामंडळाचा अधिकारी असा आहे, आणि त्यात निरीक्षक, सहायक निरीक्षक, उप-निरीक्षक किंवा कंपनी नायक, उप कंपनी नायक, सहायक कंपनी नायक किंवा कोणत्याही पदनामाने ओळखला जाणारा कोणताही समतुल्य अधिकारी, यांचा समावेश असेल मात्र यात पर्यवेक्षी अधिकारी व सुरक्षा दलाचा नाव नोंदणी केलेला सदस्य यांचा समावेश असणार नाही ;

(न) " पर्यवेक्षी अधिकारी " याचा अर्थ, महामंडळाचा अधिकारी असा आहे, आणि त्यात दुय्यम अधिकारी व दलाचा नाव नोंदणी केलेला सदस्य वगळता, कलम ३ अन्वये पर्यवेक्षी अधिकारी म्हणून व्यवस्थापकीय संचालकांनी नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश असेल ;

(प) " प्रमुख प्रतिष्ठापने " याचा अर्थ, अशा आस्थापना की तिला हानी पोहोचली किंवा जिचा नाश झाला तर देशाची किंवा राज्याची अर्थव्यवस्था, संरक्षण व सुरक्षा यावर प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे बाधा पोहचेल अशा भाभा अणुशक्ती संशोधन केंद्र, अणुऊर्जा केंद्रे, पॉवरग्रीड, पेट्रोलियम रिफायनरीज आणि तत्सम आस्थापना, असा आहे ;

(फ) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ मध्ये किंवा अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील. १९५१ चा मुंबई २२.

महामंडळ घटित करणे.

**३.** (१) राज्य शासन, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ या नावाचे एक महामंडळ, घटित करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये घटित करण्यात आलेले महामंडळ हे, जंगम व स्थावर अशा दोन्ही प्रकारच्या मालमत्तेसंबंधी करार करण्याच्या व ती संपादन करण्याच्या, धारण करण्याच्या व तिची विल्हेवाट लावण्याच्या आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करण्याच्या अधिकारासह, एक अखंड परंपरा व सामाईक मुद्रा असणारा निगम निकाय असेल व त्यास आणि त्याच्याविरुद्ध त्या नावाने दावा लावता येईल.

(३) अपर महासंचालक व महानिरीक्षक किंवा विशेष महानिरीक्षक या दर्जाचा राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियुक्त करील असा एखादा अधिकारी महामंडळाचे अध्यक्षपद भूषवील, तो व्यवस्थापकीय संचालक असेल.

(४) व्यवस्थापकीय संचालक महामंडळाच्या आवश्यकतेनुसार, कोणत्याही पदनामाने संबोधण्यात येणाऱ्या, आवश्यक असलेल्या सुरक्षा दलाचे पर्यवेक्षी अधिकारी, दुय्यम अधिकारी, सदस्य व नाव नोंदणी करण्यात आलेले सदस्य यांची नियुक्ती करील. सुरक्षा दलाचे हे सदस्य, उप महानिरीक्षक किंवा अधीक्षक दर्जाचे असतील अथवा राज्य पोलिसांमधील इतर दर्जाचे किंवा सशस्त्र दल, केंद्रीय पोलीस दल, इतर राज्य पोलीस दल आणि व्यावसायिक यांमधील समकक्ष दर्जाचे असतील, ते व्यवस्थापकीय संचालकाच्या प्रत्यक्ष व संपूर्ण पर्यवेक्षणाखाली कार्ये पार पाडतील.

सुरक्षा दल घटित करणे.

**४.** महामंडळ सुरक्षा दल घटित करील, ज्यामध्ये महामंडळाचे पर्यवेक्षी अधिकारी, दुय्यम अधिकारी, सदस्य आणि नाव नोंदणी करण्यात आलेले सदस्य यांचा समावेश असेल व त्यांना व्यवस्थापकीय संचालक विनिर्दिष्ट करील असे वेतन व पारिश्रमिक मिळेल.

५. महामंडळाचा व्यवस्थापकीय संचालक व मंडळाचा संचालक हे विहित करण्यात येईल अशा अधिकारांचा वापर करतील. व्यवस्थापकीय संचालकांचे व मंडळाच्या संचालकांचे अधिकार.

६. (१) सुरक्षा दलाच्या सदस्यांची नियुक्ती ही विहित करण्यात येईल अशा रीतीने व्यवस्थापकीय संचालकाद्वारे करण्यात येईल : सुरक्षा दलाच्या सदस्यांची नियुक्ती.

परंतु, व्यवस्थापकीय संचालक, याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या आदेशाद्वारे, या कलमान्वये नियुक्ती करण्याच्या अशा अधिकारांचा वापर करण्यासाठी कोणत्याही अन्य पर्यवेक्षी अधिकाऱ्यास प्राधिकृत करील.

(२) महामंडळाचे सर्व सदस्य, एकतर केंद्र शासन किंवा राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेले असले किंवा कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेले असले तरी, ते महामंडळाचे कर्मचारी असतील.

७. (१) सुरक्षा दलाच्या प्रत्येक सदस्यास, त्याच्या नियुक्तीनंतर, व्यवस्थापकीय संचालकाच्या किंवा व्यवस्थापकीय संचालक याबाबतीत प्राधिकृत करील अशा अन्य कोणत्याही पर्यवेक्षी अधिकाऱ्याच्या मुद्रेसह, मंडळाने विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यामध्ये प्रमाणपत्र मिळेल. असे प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीकडे सुरक्षा दलाच्या सदस्याचे अधिकार निहित असतील. त्यास, विहित केल्याप्रमाणे ओळखपत्र व गणवेष देखील प्राप्त होईल. सुरक्षा दलाच्या सदस्यांचे प्रमाणपत्र.

(२) सुरक्षा दलाचा सदस्य म्हणून, कोणत्याही कारणास्तव, जेव्हा एखाद्या व्यक्तीचे नाव असणे बंद होईल तेव्हापासून असे प्रमाणपत्र व ओळखपत्र अंमलात असण्याचे बंद होईल.

८. सुरक्षा दलाच्या नाव नोंदणी केलेल्या सदस्यांसह सुरक्षा दलाच्या सदस्यांना, विनिर्दिष्ट केलेल्या प्रशिक्षण केंद्रातून किंवा संस्थेमधून, त्यांच्या कर्तव्यांच्या संबंधात, विहित केलेले प्रशिक्षण घ्यावे लागेल. सुरक्षा दलांचे प्रशिक्षण.

९. (१) महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाचा प्रभार असणारा सचिव याचा समावेश असणारे एक संचालक मंडळ असेल, जो त्याचा अध्यक्ष असेल आणि व्यवस्थापकीय संचालक हा त्याचा उपाध्यक्ष असेल आणि यांपैकी एक मंडळाच्या बैठकींचे अध्यक्षपद भूषवील. मंडळ घटित करणे.

(२) मंडळामध्ये, व्यवस्थापकीय संचालक, महासंचालक व महानिरीक्षक, पोलीस आयुक्त, मुंबई, आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, गृह विभागाचा प्रधान सचिव (विशेष), वित्त विभागाचा प्रभारी सचिव, यांचा आणि संचालक म्हणून अपर महासंचालक व महानिरीक्षक किंवा राज्य राखीव पोलीस दलाचा प्रभारी असलेला अधिकारी यांचा समावेश असेल. राज्य शासनास, मंडळावर दोन पेक्षा अधिक नसतील इतक्या व्यावसायिक संचालकांची नियुक्तीदेखील करता येईल.

१०. महामंडळ, पुढील कार्ये पार पाडील,— महामंडळाची कार्ये.

(क) दहशतवादी संघटना, समाजविघातक घटक व अंडरवर्ल्डचे गुन्हेगार यांपैकी कोणाहीकडून देण्यात आलेल्या धमक्यांना तोंड देण्यासाठी व तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबी याकरिता, राज्य शासन व केंद्र शासनाची कार्यालये, त्यांचे उपक्रम, अशा सर्व आस्थापनांचे कर्मचारी, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, प्रमुख प्रतिष्ठापने, वित्तीय संस्था, धार्मिक संस्था, शैक्षणिक संस्था, सांस्कृतिक संस्था व वैद्यकीय संस्था आणि तत्सम ; आणि शासनाशी संयुक्त करार करून किंवा शासन किंवा शासनाच्या मालकीचे महामंडळ यांच्यात याबाबतीत सामंजस्य करार करून किंवा अन्य कोणताही शासकीय विभाग, शासकीय महामंडळ, शासकीय किंवा निमशासकीय संस्था यांद्वारे, याबाबतीत स्वतंत्र

तरतुदी करून निर्माण केलेले मोठे पूल, विशेष आर्थिक क्षेत्रे, खाजगी बंदरे व लहान धक्के, धरणे व द्रुतगती मार्ग इत्यादी पायाभूत सुविधांना आणि मॉल्स, मल्टिप्लेक्स, क्लब, हॉटेल इत्यादी यांसह व्राणिज्यिक आस्थापनांना, सक्षम प्राधिकारी यांनी केलेल्या विशेष विनंतीवरून महामंडळाने विनिर्दिष्ट केलेल्या अशा आकाराची रक्कम प्रदान केल्यावर, सुसज्ज मनुष्यबळामार्फत व्यावसायिक सेवा पुरवून त्यांचे अधिक चांगले संरक्षण करणे व त्यांना सुरक्षा पुरविणे ;

(ख) महामंडळाने विनिर्दिष्ट केलेल्या दराने आकाराची रक्कम प्रदान केल्यावर अशा सर्व उपक्रमांना, आस्थापनांना किंवा संस्थांना, त्यांच्या विनंतीवरून सुरक्षेच्या मुद्यावर तांत्रिक सल्ला सेवा पुरविणे आणि त्यांचे सुरक्षाविषयक परीक्षण करणे.

सुरक्षा दलाच्या सदस्यांची कर्तव्ये.

**११.** सुरक्षा दलाच्या प्रत्येक सदस्याचे पुढील कर्तव्य असेल,—

(क) या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या सर्व आदेशांची अंमलबजावणी करणे ;

(ख) त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दींमध्ये येत असलेल्या उपक्रमांचे, आस्थापनांचे, संस्थांचे व असे उपक्रम, आस्थापना किंवा संस्था यांची कामे पार पाडण्याकरिता आवश्यक असलेली महामंडळाने विनिर्दिष्ट केलेली प्रतिष्ठापने यांना संरक्षण देणे व संरक्षक उपाययोजना करणे ;

(ग) संरक्षण व सुरक्षा यांकरिता ज्यावर त्यास प्रतिनियुक्त केले आहे अशा इतर उपक्रमांना, आस्थापनांना किंवा संस्थांना व प्रतिष्ठापनांना संरक्षण देणे व त्यांच्याकरिता संरक्षक उपाययोजना करणे ;

(घ) खंड (खं) व (ग) मध्ये, उल्लेख केलेले उपक्रम, आस्थापना किंवा संस्था यांचे कर्मचारी व प्रतिष्ठापनांमध्ये कार्यरत असलेले कर्मचारी यांचे संरक्षण करणे आणि त्यांच्याकरिता संरक्षक उपाययोजना करणे ;

(ङ) खंड (ख) व (ग) मध्ये उल्लेख केलेले उपक्रम, आस्थापना किंवा संस्था यांचे व प्रतिष्ठापनांमध्ये कार्यरत असलेले आणि खंड (घ) मध्ये उल्लेख केलेल्या कर्मचाऱ्यांचे अधिक चांगले संरक्षण व सुरक्षा करण्यासाठी, हितावह असे कोणतेही अन्य कृत्य करणे ;

(च) कोणतेही उपक्रम, आस्थापना, संस्था व प्रतिष्ठापन यांच्या सुरक्षेच्या संबंधात, तंत्रविषयक सल्ला सेवा पुरविणे ;

(छ) महामंडळाने वेळोवेळी त्यांच्यावर सोपवलेले अन्य कोणतेही कर्तव्य पार पाडणे.

महामंडळाने कार्ये पार पाडणे.

**१२.** महामंडळ, या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार, आणि संचालक मंडळाच्या निर्देशानुसार, त्याच्या अधिकाऱ्यांमार्फत, सदस्यांमार्फत आणि नाव नोंदणी केलेल्या सुरक्षा दलाच्या सदस्यांमार्फत आपली सर्व कार्ये पार पाडील.

व्यवस्थापकीय संचालकाची कार्ये.

**१३.** (१) महामंडळाचा व्यवस्थापकीय संचालक हा मंडळाला माहिती देईल.

(२) तो, गुप्तवार्ता संदेश मिळविण्यासाठी महासंचालक व महानिरीक्षक आणि आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, पोलीस आयुक्त, मुंबई आणि दुय्यम बहुविध अभिकरण समितीच्या सतत संपर्कात असेल. ज्यामुळे, महामंडळाच्या कामकाजासाठी मार्गदर्शन मिळू शकेल.

मंडळाची कार्ये.

**१४.** (१) मंडळ, महामंडळाची कार्ये पार पाडण्यासाठी, वेळीवेळी धोरणात्मक मार्गदर्शनपर सूचना निर्धारित करील.

(२) मंडळ, महामंडळाला त्याची कर्तव्ये पार पाडण्यात देखील मदत करील.

सुरक्षा पुरविणे.

**१५.** (१) राज्य शासनाची कार्यालये, संघटना आणि राज्य शासनाचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांना महामंडळाकडून सुरक्षा घेणे अनिवार्य असेल.

(२) महामंडळाने विनिर्दिष्ट केला असेल अशा आवश्यक आकाराची रक्कम प्रदान करून शासनाची सर्व प्रमुख प्रतिष्ठापने त्यांच्या प्रतिष्ठापनांचे महामंडळाकडून सुरक्षाविषयक परीक्षण करून घेतील ; आणि अशा प्रतिष्ठापनांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा दलाच्या किती सदस्यांची आवश्यकता आहे, यांसह महामंडळाच्या सूचनांचे ते पालन करतील.

वॉरंटखेरीज अटक करण्याचा अधिकार.

**१६.** या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याकरिता, सुरक्षा दलाच्या सदस्यांनी अटक करण्याची कार्यपद्धती व अधिकार, यांचा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २.) याच्या प्रकरण पाचमध्ये तरतूद केल्याप्रमाणेच वापर करण्यात येईल ; आणि अशा सदस्याने अटक केलेल्या व्यक्तीचा ताबा तो विनाविलंब जवळच्या पोलीस ठाण्याकडे देईल.

अधिकारी व सदस्य लोकसेवक असणे.

**१७.** या अधिनियमान्वये, अशा प्रकारे नियुक्त केलेल्या सुरक्षा दलाचे अधिकारी व सदस्य, भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५.) कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येतील.

सदस्य, विशेष पोलीस अधिकारी असल्याचे मानणे.

**१८.** (१) या अधिनियमान्वये, अशा प्रकारे नियुक्त केलेले सुरक्षा दलाचे सदस्य, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई २२.) याच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत, विशेष पोलीस अधिकारी असल्याचे मानण्यात येतील.

(२) सुरक्षा दलाच्या प्रत्येक सदस्याला, त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी त्यांच्याकडे सोपवलेली शस्त्रास्त्रे वापरण्याचा अधिकार असेल.

सुरक्षा दलाचा सदस्य असण्याचे बंद केलेल्या व्यक्तींनी प्रमाणपत्र, शस्त्रे, इत्यादी, स्वाधीन करणे.

**१९.** (१) कोणत्याही कारणास्तव, सुरक्षा दलाचा सदस्य असण्याचे बंद केलेली प्रत्येक व्यक्ती, तिच्या नेमणुकीचे प्रमाणपत्र, ओळखपत्र तसेच महामंडळाच्या सुरक्षा दलाचा सदस्य म्हणून कर्तव्ये पार पाडण्यासाठी दिलेली शस्त्रे व दारूगोळा, पोषाख आणि इतर सर्व वस्तू, ते घेण्याचा अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही पर्यवेक्षी अधिकाऱ्याकडे ताबडतोब स्वाधीन करील.

(२) जर, कोणतीही व्यक्ती तिच्या नेमणुकीचे प्रमाणपत्र, ओळखपत्र, शस्त्रे व दारूगोळा, पोषाख आणि पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे तिला दिलेली इतर कोणतीही वस्तू स्वाधीन करण्यास हेतूपुरस्सर टाळाटाळ करील किंवा नाकारील तर तिला दोषसिद्धीनंतर सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा दोन्हीही शिक्षा होतील.

महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या व सदस्यांच्या कृतीस संरक्षण.

**२०.** सुरक्षा दलाचा कोणताही सदस्य, व्यवस्थापकीय संचालक, मंडळाचे संचालक, महामंडळाचे अधिकारी, महामंडळ व मंडळ हे, या अधिनियमाच्या उद्दिष्टाच्या पुरस्सरणार्थ, आपली कर्तव्ये पार पाडीत असताना, सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीसाठी, कोणत्याही दाव्यातील किंवा कार्यवाहीतील कोणत्याही फौजदारी अथवा दिवाणी कारवाईसाठी जबाबदार असणार नाही.

अधिनियम लागू करणे.

**२१.** पोलीस (अप्रीतीची भावना चेतावणे) अधिनियम, १९२२ (१९२२ चा २२.) आणि पोलीस बल (हक्क संरक्षण) अधिनियम, १९६६ (१९६६ चा ५३.) हे सुरक्षा दलाच्या सदस्यांना लागू करण्यात येतील.

नियम करण्याचा अधिकार.

**२२.** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) जेव्हा प्रथमतः नियम करण्यात येतील, ते खेरीजकरून, या अधिनियमान्वये करण्यात आलेले सर्व नियम, पूर्व प्रसिद्ध करण्याच्या शर्तीच्या अधीन असतील.

(३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहांचे एकमत झाले आणि अशा आशयाचा त्यांचा निर्णय त्यांनी **राजपत्रात** अधिसूचित केला तर तो नियम, अशा निर्णयाच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, तो अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल केल्यामुळे किंवा तो नियम रद्द केल्यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

विवक्षित सुरक्षा रक्षकांना सामावून घेणे.

**२३.** महामंडळ घटित झाल्यावर, खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ खालील सुरक्षा रक्षक मंडळ व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एमएसएम. १०९९/२३९०/ सीआर क्रमांक २४४/९९/२८, दिनांक १८ जानेवारी २००२ द्वारे घटित केलेले महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ, यांच्याद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या विवक्षित सुरक्षा रक्षकांच्या सेवा, महामंडळ घटित होण्याच्या निकटपूर्वी, त्यांना जे वेतन व इतर सेवाशर्ती लागू होत्या त्याच वेतन व सेवाशर्तींवर महामंडळामध्ये सुरक्षा दलाचा सदस्य म्हणून सामावून घेण्यात येतील ; आणि अशा सेवाशर्तींमध्ये अहितकारी बदल करण्यात येणार नाही किंवा महामंडळास, विहित केलेल्या रीतीशिवाय, सुरक्षा दलाच्या अशा सदस्यास सेवेतून काढून टाकता येणार नाही.

१९८१ चा महा. ५८.

सुरक्षा दलाच्या सदस्यांच्या नियुक्तीवरील निर्बंध.

**२४.** महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ किंवा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एमएसएम. १०९९/२३९०/सीआर क्रमांक २४४/९९/२८, दिनांक १८ जानेवारी २००२ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीस, महामंडळाशी विचारविनिमय केल्याशिवाय सुरक्षा रक्षक मंडळ किंवा महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ याद्वारे सुरक्षा रक्षक म्हणून नियुक्त करण्यात येणार नाही.

१९८१ चा महा. ५८.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**२५.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवली तर, राज्य शासनास, प्रसंगपरत्वे, ती अडचण दूर करण्याच्या दृष्टीने त्यास जी गोष्ट करणे आवश्यक किंवा इष्ट वाटेल आणि जी या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) खाली काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

२०१० चा महा. अध्या. ४. **२६.** (१) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अध्यादेश, २०१० हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशाप्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमाच्या संबंधित तरतुदीअन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNIROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक १२ ] सोमवार, एप्रिल १९, २०१०/चैत्र २९, शके १९३२ [ पृष्ठे ९, किंमत : रुपये १९.००

असाधारण क्रमांक २५


प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra State Security Corporation Act, 2010 (Mah. Act No. VI of 2010), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. VI OF 2010.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 19th April 2010).*

An Act to provide for the establishment and regulation of the Maharashtra State Security Corporation in the State of Maharashtra and for matters connected therewith or incidental thereto.

WHEREAS it was expedient to establish a Security Corporation in the State of Maharashtra for the purposes of raising a Force for providing better protection and security to the State Government and Central Government offices, undertakings, employees of all such establishments, Public Sector Undertakings, Vital Installations, Financial Institutions, Religious Institutions, Educational Institutions,

Cultural Institutions, Medical Institutions and the like; and on a specific request received from the Competent Authority to the infrastructure facilities like Major Bridges, Special Economic Zones, Private Ports and Jetties, Dams and Expressways, etc., either in joint venture with the Government or in respect of which Memorandum of Understanding has been signed between the Government or Government owned Corporation, etc., or separate provisions have been made by any other Government Department, Government Corporation, Government or Semi-Government entities; and to the Commercial Establishments including Malls, Multiplexes, Clubs and Hotels, etc., by providing professional services through well equipped manpower; and to provide technical consultancy services to all such establishments and institutions, etc., to deal with threats emanating including those from the terrorist organizations, anti-social elements and underworld criminals and for matters connected therewith or incidental thereto;

AND WHEREAS it had become necessary to provide for the establishment and regulation of the Maharashtra State Security Corporation in the State of Maharashtra ;

AND WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action to make a law, for the purposes aforesaid ; and, therefore, promulgated the Maharashtra State Security Corporation Ordinance, 2010, on the 11th March 2010 ; Mah. Ord. IV of 2010.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature; it is hereby enacted in the Sixty-first Year of the Republic of India as follows :—

Short title, extent and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra State Security Corporation Act, 2010.

(*2*) It extends to the whole of the State of Maharashtra.

(*3*) It shall be deemed to have come into force on the 11th March 2010.

Definitions.

**2.** In this Act, unless the context otherwise requires,—

(*a*) " Board " means the Board of Directors constituted under section 9 ;

(*b*) " charges " means charges as specified by the Corporation ;

(*c*) " Commercial Establishment " means an establishment which carries on any industry, business, trade, profession or service or any work in connection with, or incidental or ancillary thereto ;

(*d*) " Competent Authority " means the person managing the affairs of the State and Central Government offices, Undertakings, Industry, Industrial Undertakings, Public Sector Undertakings, Vital Installations, Financial Institutions, Religious Institutions,

Cultural Institutions, Medical Institutions, Commercial Establishments and the like, a Managing Director, Managing Agent, General Manager, Manager, Chief Executive Officer, etc., and who exercise the control over the affairs of such undertakings or establishments or institutions ;

(*e*) " Corporation " means the Maharashtra State Security Corporation constituted under sub-section (*1*) of section 3 ;

(*f*) " Director-General and Inspector-General ", " Additional Director General and Inspector General ", " Special Inspector General ", " Deputy Inspector General " and " Superintendent " means respectively the " Director-General and Inspector-General of Police ", " Additional Director General and Inspector General of Police ", " Special Inspector General of Police ", " Deputy Inspector General of Police " and " Superintendent of Police ", as defined under the Bombay Police Act, 1951 ; Bom. XXII of 1951.

(*g*) " Educational Institution " means an organisation, establishment, foundation, society, or the like, devoted to the promotion of a particular cause or programme, especially one of a public, educational or charitable nature ;

(*h*) " enrolled member of Security Force " means any member of the Corporation, other than a Supervisory officer and a subordinate officer ;

(*i*) " Financial Institution " means an Institution or organisation which collects funds from the public and places them in financial assets, offers financial services, like a Bank, Stock Exchange, Reserve Bank of India, ICICI, Industrial Development Bank of India, etc., or brokerage and insurance company that offers financial services such as deposit taking, mutual fund, checking accounts, loans, or various investment services including insurance ;

(*j*) " Government " or " State Government " means the Government of Maharashtra ;

14 of 1947. I of 1956. 9 of 1932. (*k*) " Industry " means an Industry as defined under the Industrial Disputes Act, 1947, and also includes Company as defined under the Companies Act, 1956, or a firm registered under the Indian Partnership Act, 1932, which is engaged in any industry, or in any trade, business or service ;

(*l*) " Infrastructure facilities " means the basic physical and organisational structures needed for the operation of a society or enterprise, or the services and facilities necessary for an economy to function such as roads, bridges, expressways, water supply, sewers, power grids, telecommunications and the like;

(*m*) " Medical Institution " means an institution created for the practice of medicine and includes hospitals, medical colleges and related facilities and services ;

(*n*) " member of Security Force " means a person appointed, as a member of the Security Force under section 6 ;

(*o*) " prescribed " means prescribed by rules made under this Act ;

(*p*) " Religious Institution " means a place of public worship ;

(*q*) "Security Force" means a Security Force constituted under section 4;

(*r*) "State Reserve Police Force" means the State Reserve Police Force constituted under the Bombay State Reserve Police Force Act, 1951; Bom. XXX-VIII of 1951.

(*s*) "subordinate officer" means officer of the Corporation, appointed under section 3, including an Inspector, Assistant Inspector, Sub-Inspector or Company Commander, Deputy Company Commander, Assistant Company Commander or any equivalent officer known by any other designation but does not include the supervisory officer and enrolled member of the Security Force;

(*t*) "supervisory officer" means officer of the Corporation, and includes any officer appointed by the Managing Director as a supervisory officer under section 3, other than a subordinate officer and enrolled member of the Security Force;

(*u*) "vital installation" means an establishment, which if damaged or sabotaged, affects the economy, safety and security of the Country or State directly or indirectly, like the Bhabha Atomic Research Centre, Atomic Power Stations, Power Grids, Petroleum Refineries and the like;

(*v*) words and expressions used in this Act, but not defined, in this Act, shall have the meanings respectively assigned to them in the Bombay Police Act, 1951 or in any other Act in force. Bom. XXII of 1951.

Constitution of Corporation.

**3.** (*1*) The State Government shall, by notification in the *Official Gazette*, constitute for the purposes of this Act, a Corporation to be called the Maharashtra State Security Corporation.

(*2*) The Corporation constituted under sub-section (*1*), shall be a body corporate, having perpetual succession and a common seal, with power to contract, acquire, hold and dispose of property, both movable and immovable, and to do all things necessary for the purposes of this Act, and may sue and be sued by its corporate name.

(*3*) The Corporation shall be headed by an officer of the rank of Additional Director General and Inspector General or Special Inspector General, appointed by the State Government by a notification in the *Official Gazette*, who shall be the Managing Director of the Corporation.

(*4*) The Managing Director shall appoint requisite number of supervisory officers, subordinate officers, members and enrolled members of the Security Force, by whatever designation called, as per requirements of the Corporation. These members of the Security Force shall be of the rank of Deputy Inspector General or Superintendent or other ranks from the State Police or equivalent ranks from the armed forces, Central Police Forces, other State Police Forces and professionals, who shall be discharging functions under the immediate and overall supervision of the Managing Director.

Constitution of Security Force.

**4.** The Corporation shall constitute the Security Force, which shall consist of such number of supervisory officers, subordinate officers, members and enrolled members of the Corporation, who shall receive such pay and remuneration as may be specified by the Managing Director.

5. The Managing Director of the Corporation, and the Directors of the Board shall exercise such powers as may be prescribed. Powers of Managing Director and Directors of Board.

6. (1) The appointment of the members of the Security Force shall be made by the Managing Director, in the manner as may be prescribed : Appointment of members of Security Force.

Provided that, the Managing Director, by an order as specified in this behalf, may authorise any other supervisory officer to exercise such power of the appointment under this section.

(2) All members of the Corporation shall be employees of the Corporation, either on deputation from the Central Government or the State Government or on contract.

7. (1) Every member of the Security Force shall, on his appointment, receive a certificate in the form as may be specified by the Board, under the seal of the Managing Director or any other supervisory officer, as the Managing Director may authorise in this behalf. The person holding such certificate shall be vested with the powers of member of Security Force and shall also receive an Identity Card and Uniform, as may be prescribed. Certificate of members of Security Force.

(2) Such certificate and Identity Card shall cease to have effect whenever a person named in it ceases, for any reason, to be a member of the Security Force.

8. The members of the Security Force including enrolled members of the Security Force shall have to undergo in respect of their duties a training as may be prescribed, at the training center or institution specified as such by the Corporation. Training of Security Force.

9. (1) There shall be a Board of Directors consisting of the Secretary-in-charge of the Home Department of the Government of Maharashtra, who shall be the Chairperson, and the Managing Director, who shall be the Vice-Chairperson, either of whom shall chair the Board meetings. Constitution of Board.

(2) The Board shall consist of the Managing Director, Director-General and Inspector-General, the Commissioner of Police, Mumbai, the Commissioner, State Intelligence Department, the Principal Secretary (Special) in the Home Department, Secretary-in-charge of the Finance Department, and Additional Director General and Inspector General or officer in charge of the State Reserve Police Force as Director. The State Government may also appoint not more than two professional Directors on the Board.

10. The Corporation shall perform the following duties, namely:— Duties of Corporation.

(a) to provide protection and security to State and Central Government offices, undertakings, establishments, institutions, employees of all such establishments, Public Sector Undertakings,

Vital Installations, Financial Institutions, Religious Institution, Cultural Institutions, Medical Institutions and the like; and on a specific request received from the Competent Authority to the Infrastructure facilities like major bridges, Special Economic Zones, private ports and jetties, dams and expressways, etc., either in joint venture with the Government or in respect of which Memorandum of Understanding has been signed between the Government or Government owned Corporation, etc., or separate provisions have been made by any other Government Department, Government Corporation, Government or Semi-Government entities, and to the Commercial Establishment including Malls, Multiplexes, Clubs and Hotels, etc., by providing professional services through well equipped manpower to deal with threats emanating and including those from the terrorist organizations, anti-social elements and underworld criminals and for matters connected therewith or incidental thereto, on payment of such charges as may be specified by the Corporation;

(*b*) to provide technical consultancy services to and conduct security audits of all such undertakings, establishments or institutions, on the issues of security at their request, on payment of charges as may be specified by the Corporation.

Duties of member of Security Force.

**11.** It shall be the duty of every member of the Security Force,—

(*a*) to execute the orders issued under this Act ;

(*b*) to protect and safeguard the undertakings, establishments or institutions together with such other installations as may be specified by the Corporation, to be vital for the carrying on the work of these undertakings, establishments, institutions and installations situated within the local limits of his jurisdiction ;

(*c*) to protect and safeguard such other undertakings, establishments, institutions and installation, on which he is deputed for the protection and security ;

(*d*) to protect and safeguard the employees of the undertakings, establishments, institutions and installations referred to in clauses (*b*) and (*c*) ;

(*e*) to do any other act conducive to the better protection and security of the undertakings, establishments or institutions and installations referred to in clauses (*b*) and (*c*), and the employees referred in clause (*d*) ;

(*f*) to provide technical consultancy services relating to security of any undertakings, establishments, institutions and installations ;

(*g*) to perform any other duty which may be entrusted to him by the Corporation, from time to time.

**12.** The Corporation shall discharge all its functions through its officers, members and enrolled members of the Security Force, in accordance with the provisions of this Act and the rules made thereunder and the directions of the Board. Discharge of functions by Corporation.

**13.** *(1)* The Managing Director of the Corporation shall report to the Board. Functions of Managing Director.

*(2)* The Managing Director shall be in constant liasion with the Director-General and Inspector-General, and the Commissioner, State Intelligence Department, the Commissioner of Police, Mumbai and Subsidiary Multiple Agencies Committee to receive intelligence inputs which may guide the operations of the Corporation.

**14.** *(1)* The Board shall lay down the policy guidelines, from time to time, for discharging the functions of the Corporation. Functions of Board.

*(2)* The Board shall also help the Corporation, in discharge of its duties.

**15.** *(1)* The State Government offices, Organisations and Public Sector Undertakings of the State Government shall be mandated to take security from the Corporation. Providing security.

*(2)* All Vital Installations of the State Government shall get a security audit of their installations conducted by the Corporation on payment of the requisite charges, as may be specified by the Corporation and they shall abide by its suggestions including number of members of Security Force required for its security.

**16.** In order to give effect to the provisions of this Act, the procedure and power to arrest shall be exercised by the members of the Security Force, as provided under Chapter V of the Code of Criminal Procedure, 1973, and such member shall hand over the custody of a person arrested to the nearest police station without any delay. Power to arrest without warrant.

2 of 1974.

**17.** The Officers and members of the Security Force, so appointed under this Act, shall be deemed to be public servants within the meaning of section 21 of the Indian Penal Code. Officer and member to be public servants.

45 of 1860.

**18.** *(1)* The members of the Security Force, so appointed under this Act, shall be deemed to be Special Police Officers within the meaning of section 21 of the Bombay Police Act, 1951. Member of Security Force deemed to be Special Police Officers.

Bom. XXII of 1951.

*(2)* Every member of the Security Force shall have power to use allotted weapons as may be required for the discharge of his duties.

**19.** *(1)* Every person who for any reason, ceases to be a member of the Security Force, shall forthwith surrender to any supervisory officer empowered to receive the same, his certificate of appointment, Identity Card, the arms and ammunitions, clothing and all other articles which have been furnished to him for the performance of duties as a member of the Security Force. Surrender of certificate, arms, etc., by person ceasing to be member of Security Force.

(2) Any person who willfully neglects or refuses to surrender his certificate of appointment, Identity Card, the arms and ammunitions, clothing and other articles which have been furnished to him, as required by sub-section (*1*), shall, on conviction, be punished with imprisonment for a term which may extend to six months, or fine which may extend to ten thousand rupees, or with both.

Protection of acts of officers and members of Corporation.

**20.** No member of the Security Force, Managing Director, Director of the Board, officers of the Corporation, Corporation and the Board shall be liable for any criminal or civil action in any suit or proceeding for the act done in good faith in the discharge of duties in furtherance of the object of this Act.

Application of Acts.

**21.** The Police (Incitement to Disaffection) Act, 1922 and the Police Forces (Restriction of Rights) Act, 1966 shall apply to the members of the Security Force. 22 of 1922. 53 of 1966.

Power to make rules.

**22.** (*1*) The State Government may, by notification in the *Official Gazette,* make rules for carrying out the purposes of this Act.

(*2*) Except when the rules are made for the first time, all rules made under this Act shall be subject to the condition of previous publication.

(*3*) Every rule made under this Act shall be laid, as soon as may be after it is made, before each House of the State Legislature while it is in session, for a total period of thirty days which may be comprised in one session or in two or more successive sessions, and if, before expiry of the session in which it is so laid or the session immediately following, both Houses agree in making any modification in the rule or both Houses agree that the rule should not be made and notify such decision in the *Official Gazatte,* the rules shall, from the date of publication of such notification, have effect only in such modified form or be of no effect, as the case may be; so, however, that any such modification or annulment shall be without prejudice to the validity of anything previously done or omitted to be done under that rule.

Absorption of certain security guards.

**23.** After the constitution of the Corporation, services of certain eligible security guards, appointed by the Security Guards Board under the Maharashtra Private Security Guards (Regulation of Employment and Welfare) Act, 1981 and the Maharashtra Ex-Servicemen's Corporation, constituted by the Government Order, General Administration Department, No. MSM-1099/2390/C.R. No. 244/99/28, dated the 18th January 2002, shall be absorbed in the Corporation as a member of the Security Force, on the same salary and other terms and conditions of service which were applicable to them immediately before the constitution of the Corporation ; and such conditions of service shall not be varied to their disadvantage or such member of the Security Force shall not be removed from service by the Corporation, except in the manner prescribed. Mah. LVIII of 1981.

Mah. LVIII of 1981.

**24.** Notwithstanding anything contained in the Maharashtra Private Security Guards (Regulation of Employment and Welfare) Act, 1981 or in the Government Order, General Administration Department, No. MSM-1099/2390/C.R. No. 244/99/28, dated the 18th January 2002, no person shall be appointed by the Security Guards Board or the Maharashtra Ex-servicemen's Corporation as a security guard without consultation with the Corporation. Restrictions on appointment of members of Security Force.

**25.** *(1)* If any difficulty arises in giving effect to the provisions of this Act, the Government may, as occasion arises, by an order published in the *Official Gazette,* do anything not inconsistent with the provisions of this Act, which appears to it to be necessary or expedient for the purpose of removing the difficulty: Power to remove difficulty.

Provided that, no such order shall be made after the expiry of a period of two years from the date of commencement of this Act.

*(2)* Every order made under sub-section *(1)* shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislatue.

Mah. Ord. IV of 2010.

**26.** *(1)* The Maharashtra State Security Corporation Ordinance, 2010, is hereby repealed. Repeal of Mah. Ord. IV of 2010 and saving.

*(2)* Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.